दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ: मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ २३**

## उरण वायु केंद्रातून विक्रमी वीजनिर्मिती

**मुंबई :-** महानिर्मितीच्या उरण वायु विद्युतकेंद्राने यंदा विक्रमी वीजनिर्मिती करुन गेल्या १० वर्षातील सर्वोच्च वीजनिर्मिती साध्य केली आहे. २००८-०९ या आर्थिक वर्षात या वीज केंद्राने ४४३१.७९ दशलक्ष युनिटस् इतकी विक्रमी वीजनिर्मिती केली आहे. वस्तुतः विविध नियंत्रण संस्थांनी निर्धारित केलेल्या वार्षिक उद्दिष्ट्यांपेक्षाही जास्त उत्पादन या केंद्राने केले आहे. वर्ष २००८-०९ साठी नियोजन आयोगाने ३८०२ द.ल.यु., केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने ३८१० द.ल.यु. राज्य वीज नियामक आयोगाने ३९३८ द.ल.यु. तर महानिर्मितीने स्वतःसाठीचे ४००० द.ल.यु. इतके वीजनिर्मितीचे उद्दिष्ट्य निर्धारित केले होते.

या वीज केंद्राची ९८.७१% इतकी असून ६७२ मेगावॅट स्थापित क्षमता विचारात घेतल्यास ७८.८७% संयंत्र भारांक नोंदविण्यात आला आहे. संच क्र. ७ द्वारे ८५७.१०८ द.ल.यु. अशी गेल्या १० वर्षातील सर्वोच्च वीजनिर्मिती करण्यात आली आहे. संच ६ द्वारे ८५८.५५४ द.ल.यु. अशी गेल्या १० वर्षांतील दुसऱ्या क्रमांकाची वीजनिर्मिती साध्य झाली आहे.

दिनांक २० मे, २००९ रोजी या केंद्रातून शिखर मागणीच्या काळात ७१६ मेगावॅट इतकी विक्रमी वीजनिर्मिती करण्यात आली.

या विद्युत केंद्राला पुरेशा इंधन वायुचा पुरवठा होण्यासाठी महानिर्मितीने राज्य शासनामार्फत सातत्याने पाठपुरावा केला होता. नुकताच मे. रिलायन्सशी या संदर्भात आगामी ५ वर्षांसाठी एक दीर्घकालीन करार करण्यात आला असून त्यायोगे महानिर्मितीला सुमारे १ एम.एम. एस.सी.एम.डी. इतका इंधन वायु उपलब्ध होत आहे.

राज्यातील विजेच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवरती उरण वायु केंद्राने बजावलेली कामगिरी निश्चितच वीज ग्राहकांना दिलासा देणारी आहे.

---

प्रति, दिनांक : ०८.०६.२००९

**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**